| MHBI150002372014 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक ८३/२०१४ मधील निशाणी क्र. ४४ आणि ४६ खालील आदेश</u>** |
|---|---|

[०१] निशाणी क्र.४४ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आणि निशाणी क्र.४६ वरील अर्ज प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या मागणीसह सादर केलेला आहे.

[०२] प्रस्तुत अर्जाप्रमाणे वादींनी मुळ दावा मालकी हक्क जाहिर होऊन मिळणेसाठी आणि निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे अधिपत्र प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना बजले व ते त्यांच्या विद्वान वकिलांमार्फत हजर झाले. मात्र त्यांना दाव्याशी संबंधीत महसुल विभागातील काही दस्तऐवज व न्यायालयातील पूर्वीच्या दाव्यासंबंधीचे दस्त वेळेवर मिळाले नाही. तसेच ते दरवर्षी साखर कारखान्यावर मजुरीसाठी जात असल्यामुळे त्यांना त्यांची कैफियत वेळेवर सादर करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरुध्द दिनांक १८/१०/२०१४ रोजी आणि प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्याविरुध्द दिनांक १०/१०/२०१४ रोजी विना कैफियतीचा आदेश पारीत करण्यात आला. दावा मिळकत ही स्थावर मिळकत असुन, ती त्यांची खरेदीची मिळकत आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्यात त्यांचे स्थावर मिळकतीशी संबंधीत हक्क व अधिकार विवादीत असल्यामुळे त्यांनी वरनमुद मागणींसह प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

[०३] निशाणी क्र.४४ वरील अर्जास वादींच्या वतीने निशाणी क्र.४८ वर म्हणणे सादर करण्यात आले. मात्र वारंवार संधी दिल्यानंतर देखील वादींच्या वतीने निशाणी क्र. ४६ वरील अर्जास म्हणणे सादर करण्यात आले नाही. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याशिवाय सदर अर्ज पुढे चालविण्यात आला.

[०४] दोन्ही अर्जाचे, निशाणी क्र.४८ वरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] वादींच्या वतीने निशाणी क्र.४८ वर म्हणणे सादर करत, निशाणी क्र.४४ वरील अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ व ४ यांना दाव्याचे अधिपत्र बजल्यानंतर दिनांक १६/०४/२०१४ रोजी ते हजर झाले. मात्र तद्नंतर ते वारंवार न्यायालयात हजर रहात होते. प्रतिवादी क्र.३ व ४ यांना दाव्यातील प्रत्येक हालचालीची माहिती होती. मात्र त्यांनी जाणुन बुजून त्यांची कैफियत वेळेवर सादर केलेली नाही. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्या विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारीत केलेला आहे. अभिलेखाच्या व खासकरुन दिनांक १४/०१/२०१६ रोजीच्या रोजनाम्याचे अवलोकन केले असता, त्यात प्रतिवादी क्र.३ हा त्याच्या वकिलांसह हजर असल्याचे आणि त्याच्या वकिलांनी कैफियत दाखल करणार असल्याचे तोंडी सांगितल्यामुळे पुढील तारीख देण्यात आल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र.३ व ४ यांना प्रत्येक गोष्टीची चांगल्या रितीने माहिति असतांना देखील त्यांनी कैफियत दाखल करण्यास केलेला उशीर हा जाणुन बुजून केलेला आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या वतीने वादीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या साक्षीदाराच्या पुराव्याच्या प्रती स्वीकारलेल्या असुन, त्यांनी उलटतपास घेण्याचे देखील जाणुन बुजून टाळलेले आहे. अशा सर्व परिस्थितीचा विचार करता, त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

[०६] निशाणी क्र.४४ वरील अर्जावर दोन्ही बाजुच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला. मात्र निशाणी क्र. ४६ वरील अर्जावर दोन्ही बाजुच्या वतीने युक्तिवाद करण्यात न आल्यामुळे त्यांच्या युक्तिवादाशिवाय प्रस्तुत अर्ज पुढे चालविण्यात आला.

[०७] अभिलेखाच्या अवलोकनावरुन प्रस्तुत दावा हा वादींनी दिनांक ०१/०३/२०१४ रोजी मालकी हक्क घोषीत होऊन मिळणेसाठी आणि निरंतरच्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी हजर होऊनही वेळेत त्यांची कैफियत सादर न केल्यामुळे निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये त्यांच्या विरुध्द विना कैफियत दावा पुढे चालविण्यात आलेला आहे. प्रस्तुत दावा हा प्रतिवादींच्या युक्तिवादासाठी प्रलबिंत असतांना, प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वरनमुद मागणीसह प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

[०८] अभिलेखाच्या आणि रोजनाम्याच्या काळजीपुर्वक अवलोकनावरुन दिनांक २७/०३/२०१५ रोजी दावा हा पुराव्यासाठी असतांना प्रतिवादी क्र.२ व ३ हे

त्यांच्या वकिलांसह हजर असल्याचे स्पष्ट होते. तसेच दिनांक १४/०१/२०१६ रोजी प्रतिवादी क्र.३ हा त्याच्या वकिलासह हजर होता आणि त्याच्या वकिलांनी ते कैफियत दाखल करणार असल्याचे न्यायालयास सांगितल्याचे रोजनाम्यावरुन दिसुन येते. वादी क्र.१ चा उलटतपास न घेतल्यामुळे प्रतिवादींविरुध्द दिनांक ०९/१२/२०१६ रोजी उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. तद्नंतर दिनांक २७/०१/२०१७ रोजी प्रतिवादी क्र.२ व ३ आणि त्यांचे वकिल हजर होते. दिनांक २०/०६/२०१७ रोजी प्रतिवादी क्र.३ हा न्यायालयासमक्ष हजर होता. म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारीत करण्यात आल्यानंतर देखील वारंवार प्रतिवादी क्र.२ व ३ पैकी कोणी ना कोणी दिनांक २०/०६/२०१७ रोजी पावेतो दाव्याच्या पैहरवी कामी न्यायालयात हजर असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत ते कारखान्यावर मजुरीकामी गेल्यामुळे त्यांना त्यांची कैफियत अभिलेखावर सादर करण्यास उशीर झाल्याबाबतच्या कारणात तथ्य दिसुन येत नाही.

[०९] यापुढे जाऊन प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांना कुठले दस्तऐवज मिळविण्यास पाच वर्षाचा कालावधी लागला हे स्पष्टरित्या त्यांच्या अर्जात नमुद केलेले नाही. यापुढे जाऊन त्यांनी अभिलेखावर त्यांच्या प्रस्तुत अर्जासमवेत सादर केलेल्या कैफियती समवेत कुठलेही दस्तऐवज सादर केल्याचे दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत अर्जात नमुद करण्यात आलेल्या त्यानुषंगेच्या कारणात देखील काहीएक तथ्य दिसुन येत नाही.

[१०] एकुणच अभिलेखाचा विचार करता, वारंवार प्रतिवादी क्र.२ व ३ हे हजर असतांना देखील त्यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर सादर करण्यासाठी दिनांक ०४/१०/२०१९ रोजी पावेतो कुठलेही पाऊच उचलल्याचे दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी जाणुनबुजून त्यांची कैफियत सादर करण्यास उशीर केल्याचे दिसुन येते. यापुढे जाऊन वादींच्या वकिलांनी अभिलेखावर त्यांचा लेखी युक्तिवाद दिनांक २३/०८/२०१९ रोजी सादर केल्यानंतर, दिनांक २०/०९/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ च्या वकिलांनी युक्तिवादासाठी मुदतीचा अर्ज देऊन, दिनांक ०४/१०/२०१९ रोजी प्रस्तुत अर्ज सादर केलेले आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना सुरुवातीपासुन ते शेवटपर्यंत मुळ दाव्याच्या प्रत्येक टप्प्याची आणि होणा–या कार्यवाहीची माहिती असतांना देखील, त्यांनी त्यांची कैफियत सादर करण्यास

उशीर केल्याचे स्पष्ट होते. यापुढे जाऊन अर्जात नमुद कारणांत देखील तथ्य दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याचे कुठलेही कारण दिसुन येत नाही. त्यामुळे एकुणच वरनमुद विश्लेषणाचा, कारणांचा आणि अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत अर्ज नामंजुर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे खालील आदेश

## <u>आदेश</u>

(१) निशाणी क्रमांक ४४ आणि ४६ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रस्तुत अर्जांचा खर्च प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सोसावा.

(३) दोन्ही बाजुंच्या पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(४) सदरचा आदेश पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आला.

(पंकज म. बिदादा)
दिनांकः– २३.११.२०१९. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पाटोदा.

## **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

This order is typed and uploaded by Presiding Officer of this Court.

| | |
|---|---|
| Court | : C.J.J.D. & J.M.F.C., Patoda. |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | : 23.11.2019 |
| Judgment / Order uploaded on | : 25.11.2019 |